# परभणी शहर महानगरपालिका, परभणी

- प्रशासकीय ठराव -

दिनांक ०८ जुलै, २०२२, शुक्रवार

प्रशासनाकडून आलेले प्रस्ताव

**विषय क्र.०१** **:- राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी घनकचरा संकलन प्रक्रियेच्या स्वनियंत्रण करिता ICT BASED TECHNOLOGY च्या अंमलबजावणी करिता जिल्हा नियोजन समिती मधुन निधी मागणी बाबत.**

**संदर्भ :-** १. शासन निर्णय का स्वमअ-२०२१/प्र.क्र. १२(३)/नवि-३४. दिनांक ०७ ऑक्टोबर २०२१

२. क्र. स्वमअ-२०२१/ प्र.क्र. १६३/नवि-३४: दिनांक २१ जानेवारी, २०२२

विभागाचे नाव :-यांत्रिकी विभाग

**कामाचे नावे:-** परभणी शहर महानगरपालिका अंतर्गत राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी घनकचरा संकलन प्रक्रियेच्या स्वनियंत्रण करिता ICT BASED TECHNOLOGY च्या अंमलबजावणी बाबत.

**विषयाचा प्रस्ताव :-** घनकचरा व्यवस्थापन व शहर स्वच्छतेच्या कामाच्या परिणामकारक व्यवस्थापणा करीता राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी माहिती तंत्रज्ञानवर आधारित प्रणालिचा (ICT BASED) चा वापर बंधनकारक असल्याचा निर्णय संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये घेण्यात आला आहे. Indian Telephone industries Ltd. (ITI Ltd. Government of India undertaking) कंपनीकडुन पुरविण्यात येणाऱ्या ICT BASED) TECHNOLOGY वर आधारित सेवा व त्याचे दर सदर शासन निर्णयात उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. ITI Ltd यांचेकडुन प्रणालीच्या खरेदी व अंमलबजावणी साठी स्थानिक स्वराज्य संस्था व ITI Ltd यांच्या दरम्यान थेट करारनामा प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत महानगरपालिका आयुक्त यांची असल्याबाबत संदर्भीय पत्र क्र. २ शासन निर्णयात नमुद करण्यात आले आहे.

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्र या अनुषंगाने शहरामध्ये असलेल्या No of properties ७१००० आहे, Sweeping points २५० आहे, Liquid waste points १५० आहे या आधारे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सन २०२२-२३ च्या आर्थिक वर्षामध्ये तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार रु. ४,२२,८५,३००/- पहिल्या वर्षीचा खर्च अपेक्षित आहे.

सदर विकास कामाच्या अंमलबजावणीसाठी व जिल्हा नियोजन समिती मधून निधी मागणीसाठीचा ठराव प्रशासकीय मान्यतेसाठी टिपणी सादर झालेली आहे.

**प्रशासकीय ठराव :** राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी घनकचरा संकलन प्रक्रियेच्या स्वनियंत्रण करिता ICT BASED TECHNOLOGY च्या अंमलबजावणी करिता जिल्हा नियोजन समिती मधुन रू.४,२२,८५,३००/- (अक्षरी-चार कोटी बावीस लक्ष पंचेऐंशी तिनशे रुपये) चा अनुदान सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत निधी मागणी बाबतच्या विषयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२-अ च्या तरतुदी अन्वये प्राप्त अधिकारानुसार मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

नगर सचिव
परभणी शहर महानगर,पालिका

(देविदास पवार)
आयुक्त तथा प्रशासक,
परभणी शहर महानगरपालिका, परभणी